# सायबर गुन्ह्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

पिंपरी, ता. २१ : आळंदी येथे एमआयटी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील बीसीए (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन) विभाग, पुणे सायबर सेल व विश्वास हिल फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित कार्यशाळेत सायबर गुन्हे व जागरूकता याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पहिल्या सत्रात विश्वास हिल फाउंडेशनच्या कार्यकारी प्रमुख सुरंगा दाणी यांनी समाजात सोशल नेटवर्किंग साइट्स वापरताना विद्यार्थिनी व पालकांनी तसेच इतर सामाजिक व्यवस्थांनी कोणती काळजी घ्यावी, शैक्षणिक व्यवस्थेत समाजमाध्यमांचा वापर सकारात्मक पद्धतीने व्हावा, या संदर्भात मार्गदर्शन केले. या विभागांमध्ये सामंजस्य करार झाला. यात शालेय विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे व जागरूकता या विषयावर मार्गदर्शन करून प्रात्यक्षिक दाखवणार. या उपक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फाउंडेशनकडून मानधनही दिले जाणार आहे. दरम्यान, या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात पुणे शहर सायबर सेलच्या पोलिस उपनिरीक्षक रूपाली पवार व हवालदार उमा पालवे यांनी सायबर कायदा, सायबर सुरक्षा, सायबर गुन्ह्यांची माहिती दिली. सायबर गुन्हा कसा पद्धतीने घडू शकतो, इंटरनेट कशा पद्धतीने हाताळतोय आणि ते हाताळताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. बी. वाफारे व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अमित ताले यांनी केले. आयोजन विभागप्रमुख प्रा. अक्षय कुलकर्णी, डॉ. विक्रम गायकवाड, कविता महाजन, अपर्णा खाडे, प्रिया भालघुडे, शिल्पा कोठा, सचिन घोडे यांनी केले होते.

